ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 7 | ISSUE - 4 | DEC - 2020

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# शिवकालीन नागरीकरणातील किल्ले, अरमार आणि बंदरे यांच्या योगदानाचा चिकित्सकपणे अभ्यास




डॉ. मरे राजकुमार श्रीहरी
सहा. प्राध्यापक, श्रीपतराव कदम महाविद्यालय शिरवळ,
ता. खंडाळा, जि. सातारा.

## प्रस्तावना :

कोकण किनारपट्टीचे महाराष्ट्राला वरदान लाभले आहे. कोकणच्या भौगोलिक प्रदेशाने अनेक सत्तांना जन्म दिला त्यांचे सरंक्षण आणि संवर्धन केले. या प्रदेशात प्राचीन काळापासून अनेक घराणी उदयास आली. त्यांचा विकास झाला. केंद्रवर्ती सत्तेचे अंकित असली तरी त्यांनी नेहमीच स्वतंत्र सत्ता असल्यासारखे स्वातंत्र्य उपभोगलेले दिसून येते कोकण ही व्यापक अशी संज्ञा आहे. तिच्या विस्तारासंदर्भात संशोधाकांच्यात मतभिन्नता आहे रायचौधारी यांनी 'ग्रेटर कोकण" ही संकल्पना मांडली त्यानुसार सातारामधील कराड, वीरता किवा हंगल धारवाड मधील, मराठा राज्य किवा पुण्याच्या आसपासचा प्रदेश, हव्यगा (उत्तर कनरा ), तौलुवा (दक्षिण कनरा ), केरळ आणि मलबार इत्यादी प्रदेशाचा समावेश संपूर्ण कोकण प्रदेशात केला जात होता रायचौधारीनी[1] कोकणचे पुढील विभाग पाडले आहेत-१. उत्तर कोकण २. गोवा ३. रेवती द्वीप किवा रेडी – रत्नागिरी मधील वेंगुर्ल्याच्या दक्षिणेस आठ मैल ४. सावंतवाडी – रत्नागिरी ५. ठाणे-कुलाबा जिल्हा (सोपारा-चौलचा समावेश ) ६. कर्पादिक द्वीप किंवा करादी द्वीप ७. लाट विशेषतः सुरत आणि नवसारी. तर न्या. रानडे[2] यांनी कोकणची व्याख्या करताना म्हणतात, 'सह्याद्री पर्वत आणि अरबी समुद्र यांच्यामधील चिंचोळयापट्टीला कोकण म्हणत' कोकणच्या या प्रदेशात स्वराज्याची मुहूर्तमेढ रवली गेली

शिवाजी महाराजांच्या राज्याच्या अर्थकारणात कोकणला अविभाज्य असे स्थान होते. अ. रा. कुलकर्णी[3] म्हणतात, 'कोकण हा मराठी राज्याचा कणा होता. शिवाजी महाराजांचे राज्य म्हणजे कोकणचे राज्य आणि शिवाजी महाराज म्हणजे कोकणचा राजा असे मानले जात होते. कोकणचे वर्णन 'नवनिधी' म्हणजेच नवनवीन संपत्ती निर्मितीचे नैसर्गिक ठिकाण असे केले जाते ते यथायोग्यच आहे. अशा या संपन्न कोकण प्रदेशाचे शिवकालीन नागरीकरणात मुलभूत स्वरूपाचे योगदान होते प्रस्तुत शोध निबंधाची विभागणी तीन टप्प्यात केली आहे. पहिल्या टप्प्यात शिवकालीन नागरीकरणात किल्ल्यांचे, दुसऱ्या विभागात आरमाराचे आणि तिसऱ्या टप्प्यात बंदरांचे काय योगदान होते? याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे.

## शिवकालीन नागरीकरणातील किल्ल्यांचे योगदान :

शिवाजी महाराजांचे स्वराज्यनिर्मितीचे स्वप्न किल्ल्यांनीच पूर्ण केले किल्ल्याच्या महत्त्वासंदर्भात रामचंद्रपंत अमात्य म्हणतात, 'हे राज्य तरी तीर्थरूप थोरले कैलासवासी स्वामीनी गडावरूनच निर्माण केले.' पुढे ते म्हणतात "संपूर्ण राज्याचे सार ते दुर्ग कारण दुर्ग नसता मोकळा देश उद्वस्त जाल्यावरी राज्य कोण्हास म्हणावे? या करिता पूर्वी जे जे राजे जाले त्यांनी आधी देशामध्ये दुर्गे बांधून देश शाश्वत करून

---

[1] D. K. Chakrabarti, The Ancient route of the Deccan and the Southern Peninsula, Aryan Books International, New Delhi, 2010. Page no 3-4.

[2] न्या. रानडे यांनी 'Rise of Maratha Power' या ग्रंथात कोकणची व्याख्या केली आहे.

[3] अ. रा. कुलकर्णी(संपा.), रामचंद्रपंत अमात्यकृत, आज्ञापत्र, डायमंड प्रकाशन, पुणे२००७. पृ. क्र.६८.

घेतला, आले परचक्र संकट दुर्गाश्रयी परिहार केले" यावरून राज्याचे मूळ म्हणजेच किल्ले. शिवकाळात किल्ल्याशिवाय राज्याला आकार नव्हता. राज्याच्या स्थायित्वाचा, संरक्षणाचा, कोषाचा, अर्थकारणाचे आणि विस्ताराचे मूळ किल्ल्यात होते. थोडक्यात किल्ल्यांनी शिवकाळात दुहेरी भूमिका बजावलेली दिसते राज्य संरक्षण व संवर्धनाबरोबरच राज्याला आर्थिक बळकटी देण्याचेही काम केले. महाजन टी. टी.[4] यांच्या मते, किल्ले राजकीय सत्तेचे केंद्र असून ते नागरी आणि व्यापारी केंद्रांना संरक्षण देण्याचे आणि व्यापारी वस्तू बाजारपेठेत वितरित करण्याचे महत्त्वपूर्ण केंद्र होते.

किल्ल्यांच्या बांधकामाच्या वेळी किल्ल्यावर बाजारपेठेची निर्मिती करण्यात येत होती. याची प्रचीती आपणास रायगड आणि राजगड या दोन किल्ल्यावरील बाजारपेठांचे अवशेष आजही देतात. गो. नी. दांडेकर[5] रायगडावरील बाजारपेठेविषयी म्हणतात, 'रायगडावरील बाजारपेठ खूपच प्रशस्त. त्रेचाळीस दुकाने दोन ओळीत अशी बांधली आहेत कि, तो नगरनिर्मात्यासमोर एक चिरकालिक आदर्श बसला आहे.'

किल्ल्याचे बांधकामाचे अजून एक वैशिष्ट्य म्हणजे काही किल्ल्यावर टांकसाळीची निर्मिती केली जात होती त्याचबरोबर किल्ल्यांची निर्मिती व्यापारी मार्गावर आणि शहरांजवळ केली जात असे कि जेणेकरून नागरी केंद्रे व व्यापारी केंद्रे यांना सरंक्षण पुरवणे सोपे जाईल. उदाहरणार्थ सिंहगड, शिवनेरी, पुरंदर, राजगड, पन्हाळा यासारख्या किल्ल्यांमुळे व्यापारी मार्गांच्या सरंक्षणाबरोबरच पुणे, जुन्नर, महाड आणि कोल्हापूर यासारख्या व्यापारी आणि नागरी केंद्रांचे सरंक्षण करणे शक्य झाले होते.

शिवाजी महाराजांचा कोकणशी संपर्क आल्यानंतर सागरी किल्ले बांधले तर काहीं जिंकून घेऊन त्यांची डागडुजी केली. सागरी किल्ल्यांमुळे सागरी व्यापार आणि मार्ग यांचे संरक्षण करणे सहज शक्य झाले. तसेच परकीय सत्तांवर नियंत्रण आणि वचक ठेवणे सोयीस्कर झाले. तत्कालीन पर्यावरणात सागरी किल्ल्यांचे व्यापारी आणि राजकीय महत्त्व याची जाण असणारे शिवाजी महाराज एकमेवाद्वितीय होते. शिवाजी महाराजांनी सागरी किल्ल्यांचा बंदरांच्या सरंक्षणासाठी आणि त्यामधून होणाऱ्या व्यापाराच्या सुरक्षितेसाठी वापर केला. किल्ल्यांद्वारे त्यांनी व्यापारी बंदरांना सरंक्षण दिले पुरवठावाहिनीतील संपर्कबिंदू म्हणून किल्ल्यांचा त्यांनी उपयोग करून घेतला किल्ल्यासंदर्भात शिवाजी महाराज म्हणतात, 'जैसे कुळंबी शेतास माळा घालून शेत राखितो, तसे किल्ले राज्यास रक्षण आहेत. तारवांस खिळे मारून बळकट करितात, तशी राज्यास बळकटी किल्ल्यांची आहे. किल्ल्यांच्या योगाने औरंगजेबशहासारख्याची उमर गुजरून जाईल.' "आपणास धर्मस्थापना व राज्यसंपादन करणे सर्वास अन्न लावून, शत्रूप्रवेश न होय, ते किल्ल्यांमुळे होते सर्वांचा निर्वाह आणि दिल्ली सारखा शत्रू उरावर आहे. तो आला तरी नवे जुने तीनशे साठ किल्ले हजरतीस आहेत. एक एक किल्ला वर्ष वर्ष लढला, तरी तीनशे साठ वर्षे पाहिजेत.'[6]

थोडक्यात शिवकालीन नागरीकरणात किल्ल्यांचे योगदान मूलगामी स्वरूपाचे होते याकाळात किल्ल्यांची एक साखळी निर्माण होऊन स्वराज्याला राजकीय, भौगोलिक आणि आर्थिक संरक्षण देण्याची महत्त्वपूर्ण जबाबदारी किल्ल्यांवर होती ती त्यांनी चोखपणे पार पडलेली दिसून येते.

## शिवकालीन नागरीकरणातील आरमाराचे योगदान :

शिवाजी महाराजांनी आरमार निर्मितीची योजना कोकणचा प्रदेश काबीज केल्यानंतर आखलेली दिसून येते कोकणाचा प्रदेश अनेक खाड्यानी युक्त असा होता आणि त्याचा उपयोग जहाजांना आधारासाठी मोठ्याप्रमाणात होत होता. शिवाजी महाराजांच्या आरमाराविषयी अमात्यांनी आज्ञापत्रात माहिती दिली आहे. आमात्य आज्ञापत्रात म्हणतात, 'आरमार म्हणजे स्वतंत्र राज्यांगच आहे जैसे ज्यास अश्वबळ त्याची पृथ्वी आहे तद्वतच ज्याच्या जवळ आरमार आहे त्याचा समुद्र याकरिता आरमार अवश्यमेव करणे'[7] आरमारामुळे शिवाजी महाराजांना देशी आणि विदेशी शत्रूंना तोंड देणे सहज शक्य झाले कोकणाचा प्रदेश आरमार निर्मितीसाठी अनुकूल होता. येथे नैसर्गिक बंदरे अस्तित्वात होती. त्याच बरोबर जहाज निर्मितीसाठी आवश्यक असणारा कच्चा माल याठिकाणी मुबलक स्वरुपात उपलब्ध होता. त्यामुळे शिवाजी महाराजाना लढाऊ जहाजे आणि व्यापारी जहाजे तयार करणे सहज शक्य झाले राजांचे आरमार एवढे प्रबळ होते

[4] T. T. Mahajan, Aspects of Agrarian and Urban History of the Maratha, New Delhi, 1991. Page no 92.

[5] जयसिंगराव पवार(संपा.), छत्रपती शिवाजी महाराज स्मृतीग्रंथ, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे, २०११. पृष्ठ क्रमांक २६.

[6] गो. स. सरदेसाई, मराठा रियासती, खंड १, शहाजी राजे भोसले शककर्ता शिवाजी, पुणे १९८८. पृ. क्र. ३७२.

[7] अ. रा. कुलकर्णी(संपा.), उपरोक्त, पृ. क्र. ६९.

कि, एक इंग्रज म्हणतो कि, 'तो स्वतः खलाशी नव्हता म्हणून बरे, नाही तर त्याने जमिनीचा पृष्ठभाग साफ करून टाकला असता, त्याचप्रमाणे समुद्रही साफ करून टाकला असता.'[8]

## शिवकालीन नागरीकरणातील बंदरांचे योगदान :

शिवकाळात अनेक गाजबलेली व्यापारी केंद्रे अस्तित्वात होती. तर काही नव्याने उदयास येत होती. याची माहिती फॅक्टरी रेकॉर्ड्स, परकीय प्रवाश्यांची वर्णने आणि तत्कालीन मराठी साधने यावरून मिळते. अँबे कॅरे[9] म्हणतो कि, 'All the coast from Cheul to Goa for the space of 250 miles belonged to Shivaji, he had several forts besides cities and towns.'शिवकाळात चौल, दाभोळ, कल्याण-भिवंडी, राजापूर, चिपळूण, वेंगुर्ला यासारखी अनेक बंदरे व्यापारी बंदरे म्हणून उदयास येत होती यातील काही बंदरे प्राचीन काळापासूनच विकसित अवस्थेत होती तर काही शिवकाळात उदयास आली होती.याशिवाय कारवार, गोवे, मालवण, जैतापूर, रायपाटण, सातवळी, आचरे, रत्नागिरी, चिपळूण, महाड, दंडराजापुरी, नागाव, नागोठाणे यासारखी कितीतरी लहान-मोठी बंदरे कोकणात होती. वा. कृ. भावे[10] म्हणतात, 'यांची संख्या शंभरहून अधिक भरेल. शंभर बंदरे म्हणजे कोकणात माल घेऊन येणाऱ्या व जाणाऱ्या शंभर वाटा होत. ही महाराष्ट्राची शंभर तोंडे असून त्यांजमार्फत महाराष्ट्रात संपत्ती येत होती वमहाराष्ट्राबाहेर जात होती. किंबहुना महाराष्ट्रातील त्या रक्तवाहिन्या होत्या म्हटले तरी चालेल.'

## उपसंहार :

शिवाजी महाराजांचा व्यापारविषयक दृष्टीकोन हा व्यापार वृद्धीसाठी कारणीभूत ठरला त्यांनी संरक्षणात्मक जकातीचे धोरण आखले. त्यांनी व्यापारास नेहमी प्रोत्साहन दिले. अमात्य आज्ञापत्रात म्हणतात, 'साहुकार म्हणजे राज्याची व राजश्रीची शोभा, सहुकाराकरिता राज्य अबादान होते, न मिळे वस्तुजात राज्यांत येते राज्य श्रीमंत होते, पडिले संकट प्रसंगी पाहिजे ते कर्जवाम मिळते तेणे करून आले संकट परिहार होते......'[11] या नितीनेच शिवाजी महाराजांनी आपले व्यापारविषयक धोरण आखले. परिणामी नागरी केंदांचा याकाळात उदय झालेला दिसून येतो.

एकंदरीत विचार केला असता शिवकालीन स्वराज्याच्या उभारणीत, निर्मितीमध्ये किल्ले, आरमार आणि बंदरे याचा सिंहाचा वाटा होता. संकटप्रासंगी त्यांनी आपली उपयुक्तता सिद्ध केलेली दिसून येते कोष हा राज्याचा आत्मा असतो. आणि या कोशात दिवसेंदिवस वाढ करण्याची महत्त्वपूर्ण कामगिरी या घटकांनी केलेली दिसून येते त्यामुळे शिवाजी महाराजांना परकीय शत्रूंपासून आपले राज्य सुरक्षित ठेवणे सहज शक्य झाले.

---

[8] गो. स. सरदेसाई, उपरोक्त, पृ. क्र. ३८७.

[9] T. T. Mahajan, op cit, page no, 99.

[10] वा. कृ. भावे, शिवकालीन महाराष्ट्र, वरदा प्रकाशन, पुणे, १९८८. पृ. क्र. २१३.

[11] अ. रा. कुलकर्णी(संपा.), उपरोक्त, पृ. क्र. ५४.